स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# प्राथमिक शिक्षण संचालनालय,
## डॉ. ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे-1.

दुरध्वनी क्र. 020-26125692 ई-मेल- : depmah2@gmail.com

प्राशिसं/संकीर्ण/२०२२/५१६/ दिनांक- /०४/२०२२.

**प्रति,**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. सर्व

**विषयः शालेय विद्यार्थ्यांपर्यंत तंबाखूमुक्त शाळा, आरोग्य आणि स्वच्छता ह्या विषयांवर शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन पध्दती आणि प्रत्यक्ष्य सहभागातून वर्ष २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात सलाम मुंबई फाउंडेशनला शिक्षक सभा आयोजित करता यावी ह्यासाठी प्रस्ताव सादर करीत आहोत.**

**संदर्भः** १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२३३४/एस.डी-४, दि. १०/०२/२०२१.

२. सलाम मुंबई फाउंडेशन यांचे पत्र दि. २८/०३/२०२२.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राचे अवलोकन व्हावे (प्रत संलग्न). महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागाने सन २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रातील सर्व शाळा तंबाखूमुक्त होण्यासाठी दि. १०/०२/२०२१ चे परिपत्रक प्रसिध्द केलेले आहे.

या पार्श्वभूमीवर सलाम मुंबई फाउंडेशने शालेय विद्यार्थ्यांपर्यंत तंबाखूमुक्त शाळा, आरोग्य आणि स्वच्छता ह्या विषयांवर शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यामाने ऑनलाईन पध्दती आणि प्रत्यक्ष सहभागातून वर्ष २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात शिक्षक सभा आयोजित करता यावी ह्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्या अनुषंगाने या विषयी आपल्या कार्यालयाकडून गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**(दिनकर टेमकर)**
संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२. मा. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे-०१.

प्रत - श्री. दिपक पाटील, सहाय्यक व्यवस्थापक, सलाम मुंबई फाऊंडेशन, मुंबई.

पत्र २०२१-२२ ५२

SALAAM MUMBAI FOUNDATION

# तंबाखूमुक्त आरोग्यदायी शाळा कार्यक्रम


**(आरोग्य, स्वच्छता आणि तंबाखूमुक्त शाळा)**

## ऑनलाईन सिस्टम आणि आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष सहभागातून

## सलाम मुंबई फाउंडेशन संस्थेस

## जिल्हास्तरीय आणि तालुका स्तरीय शिक्षक सभा आयोजित करता यावी ह्यासाठीचा

## प्रस्ताव



# चला बनवूया तंबाखूमुक्त-आरोग्यदायी शाळांचे महाराष्ट्र राज्य

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३**

Registered Office : 1 st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai - 400 021
Tel: (91-22) 6149 1900 / 6693 1500
Email : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

'Registered under the Bombay Public Trust Act 1950 vide No. E-27122 (Mum) dated 05-07-2010'

SALAAM MUMBAI FOUNDATION

दिनांक : २८ मार्च २०२२

प्रति,
मा. संचालक,
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे
महाराष्ट्र राज्य

**विषय -** शालेय विद्यार्थ्यांपर्यंत तंबाखूमुक्त शाळा, आरोग्य आणि स्वच्छता ह्या विषयांवर शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन पध्दती आणि प्रत्यक्ष्य सहभागातून वर्ष २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात सलाम मुंबई फाउंडेशनला शिक्षक सभा आयोजित करता यावी ह्यासाठी प्रस्ताव सादर करीत आहोत.

**मा. महोदय,**
तंबाखूमुक्त शाळा कार्यक्रम शालेय स्तरावर अधिक सक्षम व्हावा याहेतूने शिक्षण विभागातर्फे खूप चांगले सहकार्य मिळत आहे त्याबद्दल आपले आभार.

सलाम मुंबई फाउंडेशन २००७- ०८ सालापासून महाराष्ट्रात शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, आदिवासी कल्याण मंत्रालयांसोबत नवी पिढी व्यसनमुक्त आणि आरोग्यदायी रहावी ह्यासाठी कार्य करीत आहे. आजमितीस तंबाखूमुक्त शाळा कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील १४२९६५ शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले असून ५९३ सेवाभावी संस्था देखील या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत. १२१२१ डीएड आणि बीएड विद्यार्थी, १५३८९ पोलीस देखील प्रशिक्षित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात आजपर्यंत एकूण ३७८९२ शाळा तंबाखू मुक्त झालेल्या आहेत. गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रातील यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यातील जिप शाळा आणि नंदुरबार आणि धुळे ह्या जिल्ह्यांतील प्राथमिक आणि माध्यमिक शाळा तंबाखूमुक्त शाळा म्हणून घोषित केल्या आहेत. याचे सर्व श्रेय शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि अधिकारी वर्गास जाते. शिक्षण विभागाच्या सहकार्य शिवाय हे लक्ष्य साध्य करणे अशक्य होते.

वर्ष २०२०-२१ मध्ये महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये ऑनलाइनच्या माध्यमातून प्रशिक्षणे घेण्यात आली. एकूण ३४ जिल्ह्यातील ऑनलाइन प्रशिक्षणाच्या माध्यमातून २०२७१ शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व शाळा लवकरच तंबाखूमुक्त कराव्यात असे आवाहन करण्यात आले. तंबाखूमुक्त शाळा प्रक्रियेत केंद्रप्रमुखांचा सहभाग वाढावा म्हणून यावर्षी ३३४७ अधिकारी आणि केंद्रप्रमुखांना प्रशिक्षित करण्यात आले. यासोबतच शालेय विद्यार्थ्यांना एक स्वतंत्र हक्काचे व्यासपीठ मिळावे याहेतूने राष्ट्रीय बालपरिषदेचे आयोजन देखील करण्यात आले होते ज्यामध्ये ०५ राज्यातून ३७५ विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, सेवाभावी संस्था इत्यादींनी सहभाग घेतला. मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभ संदेशाद्वारे सर्व शाळा तंबाखुमुक्त करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तंबाखूमुक्त शाळा अभियान शालेय स्तरावर गतिमान होण्यासाठी आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाने येलो लाइन कॅम्पेन सुरु केलेली आहे. या कॅम्पेनचा मुख्य हेतू हाच आहे कि शालेय विद्यार्थ्यांना तंबाखूममुक्त आणि आरोग्यदायी जीवन मिळावे. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात तंबाखूममुक्त आणि आरोग्यदायी जीवन जगता यावे यासाठी सलाम मुंबई फाऊंडेशन आरोग्य विभाग आणि शिक्षण विभागाच्या सहकार्याने सर्व शाळांसोबत कार्य करीत आहे. कोविद-१९ या महामारीच्या काळात तंबाखूजन्य पदार्थ सेवन केल्याने कोरोना होण्याचा धोका जास्त आहे हे सिद्ध झाले म्हणून शालेय विद्यार्थी, युवक आणि समाजाने तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर रहावे आणि कोरोना मुक्त जीवन जगावे यासाठी सत्र विकसित करण्यात आले. तंबाखूमुक्त शाळा उपक्रमास अधिक गती यावी यासाठी मागील दोन वर्षा पासून यवतमाळ, धूळे, वर्धा आणि नंदुरबार ह्या जिल्ह्यांत आरोग्य आणि स्वच्छता ह्यां विषयांवर ४०० शाळांत युथ - फेलोंच्या मार्फत काम सुरू आहे.

Registered Office : 1 st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai - 400 021
Tel: (91-22) 6149 1900 / 6693 1500
Email : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

सलाम मुंबई फाउंडेशनच्या तंबाखू नियंत्रणावर सुरु असलेल्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने घेतली असून म. गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार संस्थेला प्रदान केला आहे. बालभारती ने इयत्ता १० वी च्या विज्ञान पुस्तकात सलाम मुंबई फाऊंडेशन च्या कार्याचा उल्लेख केला आहे. महाराष्ट्रातील यशानंतर आता सलाम मुंबई फाउंडेशनने भारतातील १० राज्यांत तंबाखूमुक्त शाळांचे काम स्थानिक शासनासोबत सुरू केले आहे. तंबाखूमुक्त शाळांच्या निकषांची महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये प्रभावी अमलबजावणी व्हावी ह्यासाठी संस्था जिल्हा आणि तालुका स्तरावर प्रशिक्षणे आयोजित करणे, शैक्षणिक साहित्य पुरविणे, शाळा भेटी करणे, Tobacco Free School App वर शाळांनी योग्य दस्तावेज अपलोड करावेत ह्यासाठी फोनवर पाठपुरावा करणे, तंबाखूमुक्त शाळांचा, शिक्षकांचा आणि अधिकाऱ्यांचा प्रमाणपत्र आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करणे आदी कार्य सलाम मुंबई फाउंडेशन करीत आहे. याचाच सकारात्मक परिणाम म्हणून दिनांक १० फेब्रुवारी २०२१ रोजी शिक्षण विभागाने तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थांच्या ०९ निकषांचे परिपत्रक निर्गमित केलेले आहे ज्याद्वारे सर्व शाळांनी तंबाखूमुक्त शाळांचे ०९ निकष पूर्ण करावेत असे सूचित केलेले आहे..

यावर्षी म्हणजेच वर्ष २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रातील सर्व शाळा तंबाखूमुक्त होण्यासाठी महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागाने जे परिपत्रक जरी केलेले आहे त्याची पूर्तता सर्व शाळांनी करावी यासाठी सलाम मुंबई फाऊंडेशन तर्फे कार्यक्रम राबविण्यात्त येईल. यासाठी शिक्षण विभागाकडून आम्हास पुढील प्रमाणे सहकार्य मिळावे हि विंनती.

१ सलाम मुंबई फाऊंडेशन तर्फे शिक्षक , मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांना दोन तास ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाईल. शिक्षण विभागातर्फे शिक्षकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या तंबाखूमुक्त शाळा निकषांविषयी माहितीचा समावेश केला जाईल. (जुलै आणि ऑगस्ट २०२२)

२ इयत्ता ०५ ते १० वि च्या पाठयपुस्तकात तंबाखू नियंत्रण कार्यक्रम संदर्भात देण्यात आलेल्या माहितीवर आधारित, सलाम मुंबई फाऊंडेशन ने विकसित केलेले सर्व साहित्य (पोस्टर्स, चित्रफीत, माहिती पुस्तिका इ.) ऑनलाइन च्या माध्यमातून शिक्षकांपर्यंत पोहचविले जाईल.

३ तंबाखू नियंत्रण कायदा २००३ अंतर्गत सर्व जिल्ह्यातील शाळा तंबाखूमुक्त करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समितीची बैठक घेण्यात येईल. तसेच जिल्हा स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्यासोबत आढावा बैठक घेण्यात येतील. (जुलै / ऑगस्ट २०२२)

४ महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांनी तंबाखूमुक्त शाळांचे ०९ निकष पूर्ण करावेत यासाठी आपल्या कडून सूचना जाव्यात.

५ तंबाखूमुक्त शाळा पुरावे टीएफएस ऑनलाईन ॲप वर शिक्षकांनी सादर करावेत यासाठी त्यांना प्रेरित करण्यात येईल ( ऑक्टोबर २०२२ )

६ तंबाखूमुक्त आणि आरोग्यदायी शाळांचा जिल्हा म्हणून निवड झालेल्या जिल्ह्याची घोषणा करण्याचा कार्यक्रम केला जाईल (14 नोव्हेंबर २०२२)

७ जागतिक कर्करोग **दिनानिमित्त ( 4 फेब्रुवारी 2023 )** रोजी भारतातील पहिले राज्य तंबाखूविरोधी शाळा-महाराष्ट्र घोषित करणे.

Registered Office : 1 st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai - 400 021
Tel: (91-22) 6149 1900 / 6693 1500
Email : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

'Registered under the Bombay Public Trust Act 1950 vide No. E-27122 (Mum) dated 05-07-2010'

SALAAM MUMBAI FOUNDATION

८ स्काऊट मार्गदर्शक आणि एनएसएस विभाग यांचा सहभाग घेऊन सलाम मुंबई फाऊंडेशन तर्फे ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल आणि शाळा पहाणी व सर्व शाळांनी ०९ निकषांची पूर्तता करावी यासाठी या सर्वांना प्रशिक्षित करण्यात येईल. ( जून २०२२)

९ तंबाखूचे दुष्परिणाम आणि तंबाखू नियंत्रण याविषयीची माहिती सर्व श्रेणीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. आम्ही ऑनलाईन सत्रात जीवन कौशल्य विकसित कार्यक्रमावर आधारित सत्र, तंबाखू आणि दुष्परिणाम आणि आरोग्यदायी जीवन याविषयीची माहिती महाराष्ट्रातील प्रत्येक मुलापर्यंत पोहोचवू. जीवन कौशल्य आणि आरोग्यदायी जीवन या विषयावर आधारित सत्रे मुलांना त्यांच्या भविष्यातही मदत करतील.

१० सर्व शासकीय आणि अशासकीय घटकांसोबत प्रशिक्षणाचे आयोजन केले जाईल.

११ राष्ट्रीय बालपरिषद अंतर्गत विद्यार्थ्यां सोबत ऑनलाइन सत्र घेण्यात येतील. विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यात येईल.आणि राष्ट्रीय बालपरिषद ०४ फेब्रुवारी २०२३ मध्ये घेण्यात येईल.

१२ तंबाखूमुक्त शाळा उपक्रमास अधिक गती यावी यासाठी मागील तीन वर्षांपासून यवतमाळ आणि नंदुरबार तर मागील दोन वर्षांपासून धुळे आणि वर्धा ह्या जिल्ह्यांत तंबाखूमुक्त, आरोग्य आणि स्वच्छ शाळा ह्या विषयांवर ४०० शाळांत युथ - फेलोंच्या मार्फत काम सुरू आहे. निवडलेल्या ०४ जिल्ह्यात हा कार्यक्रम शालेय स्तरावर अधिक चांगल्या प्रकारे सक्षम होण्यासाठी आणि शिक्षकांचा सहभाग वाढविण्यासाठी कृती कार्यक्रम घेण्यात येतील.

१३ सलाम मुंबई फाऊंडेशन तर्फे यशोगाथा, आणि अहवाल तयार करण्यात येतील आणि सर्व अहवाल आपणास सुपूर्द करण्यात येतील

१४ शिक्षण विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय, जिल्हास्तरावर आणि तालुका स्तरावरील ऑनलाइन वेबिनार मध्ये सलाम मुंबई फाऊंडेशन संस्थेस वर्षातून दोन वेळा, वेळ देण्यात यावा.

१५ महाराष्ट्रातील सर्व केंद्र प्रमुखांनी शाळा तपासणी करताना, संबंधित सर्व शाळांनी तंबाखूमुक्तीचे ०९ निकष पूर्ण करावेत यासाठी प्रयत्न करावेत.

मा. महोदय ह्या संदर्भात आम्ही सदर प्रस्ताव सादर करीत आहोत. आपण प्रस्तावाचा विचार करावा आणि आम्हास कार्यक्रम राबविण्यास अनुमती द्यावी ही नम्र विनंती.
शालेय शिक्षण विभागाच्या सहकार्यानेच तंबाखूमुक्त शाळा अभियान शालेय आणि गाव स्तरावर सक्षम होत आहे. आपण करीत असलेल्या सहकार्याबद्दल खूपखूप आभार.
(महाराष्ट्र शासनाने तंबाखूमुक्त शाळांचे धोरण निर्गमित केलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडत आहोत )

धन्यवाद,

दीपक पाटील (सहाय्यक व्यवस्थापक )
सलाम मुंबई फाउंडेशन.

Registered Office : 1 st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai - 400 021
Tel: (91-22) 6149 1900 / 6693 1500
Email : info@salaammumbai.org
www.salaammumbai.org

'Registered under the Bombay Public Trust Act 1950 vide No. E-27122 (Mum) dated 05-07-2010'

**सर्व शैक्षणिक संस्थामध्ये तंबाखूमुक्त**
**शाळा धोरण-२०२० राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२३४/एस.डी.- ४.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२१.

**वाचा** :- १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४२/एस.डी.-४, दिनांक- ०६ जून, २०१९
२) भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे दि. ८ जानेवारी,२०२१ चे पत्र क्र. File No.१३-३६/२०१९-IS-११ अन्वये नविन मार्गदर्शक सूचना.

**परिपत्रक :-**

सध्या जगभरात तंबाखू वापरामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. तंबाखू हा कॅन्सर,मधुमेह,ह्रदयरोग यांसारख्या आजारासाठी प्रमुख कारणीभूत घटक आहे. भारतामध्ये तंबाखू मुळे दरवर्षी १३ लाख लोक मृत्यूमुखी पडतात व आजस्थितीला २७ कोटी लोक तंबाखूच्या विळख्यात सापडले आहेत. ग्लोबल युथ सर्वे-२००९ नुसार भारतामध्ये १३ ते १५ वयोगटातील १४.६ टक्के विद्यार्थी तंबाखू सेवनाच्या आहारी गेलेले आहेत. शासनाने तंबाखू नियंत्रणासाठी वेळोवेळी विविध उपयोजना करून काही प्रमाणात तंबाखूचा प्रचार,प्रसार व वापरास आळा घातला आहे. आपल्या देशातील विद्यार्थ्यांना तंबाखूच्या विळख्यातून बाहेर काढून त्यांना तंबाखूमुक्त वातावरण मिळावे यासाठी भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था धोरण-२०२० अंतर्गत नविन मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

वरील संदर्भ क्र.१ येथील शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४२/एस.डी.-४, दिनांक- ०६ जून, २०१९ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या तुलनेत भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे दि. ८ जानेवारी,२०२१ च्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या नविन मार्गदर्शक सूचना अधिक सर्वसमावेशक असल्याचे दिसून येते, त्यामुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे दिनांक ०६ जून,२०१९ रोजीचे परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून केंद्र शासनाच्या खालील मार्गदर्शक सूचनांची सर्व शाळांनी अमलबजावणी करावी.

**मार्गदर्शक सूचना :-**

१. तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थांचा फलक शैक्षणिक संस्थेच्या आवारात व तंबाखुमुक्त क्षेत्राचा (४५ cm * ६० cm) फलक शैक्षणिक संस्थेच्या बाहेर लावावा. हे फलक शाळेच्या प्रमुख ठिकाणी शिक्षणाच्या व स्थानिक भाषेत लावलेली असावीत. या फलकांवर शैक्षणिक संस्थेने अधिकृत केलेल्या व्यक्तीचे (शैक्षणिक संस्था प्रमुख) नाव,पदनाम व संपर्क क्रमांक दिलेला असावा.

२. शैक्षणिक संस्थेने आपल्या कर्मचारी व विद्यार्थ्यामधून तंबाखू निरीक्षक (TOBACCO MONITER) नियुक्त करावेत, आरोग्य व फिटनेस दुतांनाही तंबाखू मॉनिटर म्हणून नियुक्त केले जावे व फलकावर तंबाखू मॉनिटर्सची नावे, पदनाम व संपर्क क्रमांक नमूद करावा.

३. तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करणारी कोणतेही दुकान शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात नसावे, शैक्षणिक संस्थेच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थ वापराचा कोणताही पुरावा असू नये व शैक्षणिक संस्थेच्या बाहय भिंतीपासून १०० यार्ड क्षेत्र रेखाकित केले गेले असावे. या नियमांचा भग झाल्यास राष्ट्रीय क्वीट लाइन (Quit line) या हेल्पलाईन वर तक्रार करावी व यासंदर्भात दंड लादण्याचा अधिकार त्या शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांना असेल. अशा पदार्थांची विक्री थांबिवण्यासाठी व्यवस्थापन समितीने स्थानिक प्रशासन व पालकांच्या सहाय्याने प्रयत्न करावेत

४. तंबाखूचा वापर शाळेच्या परीसरात केला जाणार नाही या नियमाचा समावेश संस्थेने आपल्या संहितेमध्ये करावे.

५. सर्व शैक्षणिक संस्था या सार्वजनिक ठिकाणी असतात त्यामुळे अशा ठिकाणी धुम्रपान करणे हा तंबाखू नियत्रंण कायद्याच्या कलम ४ अन्वये गुन्हा आहे. COTPA २००३(Cigarettes and other tobacco products Act) मधील कलम ४ चे उल्लंघन केल्यास शैक्षणिक संस्थेचे प्रमुख (मुख्याध्यापक/प्राचार्य/प्राधिकृत शिक्षक) यांना दंड लादण्याचा अधिकार असेल.

६. शैक्षणिक संस्थानी तंबाखू वापर करणाऱ्या व व्यसनाधीन व्यक्तीना तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी उत्तेजन दयावे व Quitline Services and mCessation Services याबाबत माहिती दयावी.

७. तंबाखू मुक्त शैक्षणिक संस्थानी कोणत्याही तंबाखूचे उत्पादन,प्रचार व व्यापार करणाऱ्या कंपनीने प्राधिकृत केलेल्या कार्यक्रमात सहभागी होऊ नये अथवा शिष्यवृत्ती स्विकारू नये.

८. तंबाखू नियंत्रकांनी इ-सिगारेट यासारख्या साधनानप्रति जागरूक राहावे.

९. प्रत्येक शैक्षणिक संस्थेने सोबतच्या विवरणपत्रात जोडलेल्या ९ निकषांच्या आधारे स्वमुल्यांकन करून सहामाही आढावा घ्यावा.ज्या शाळेला १०० पैकी ९० गुण मिळतील ती शैक्षणिक संस्था तंबाखूमुक्त म्हणून जाहिर करावी,पुढे ही संस्था तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था पुरस्कार योजनेमध्ये सहभगी होऊ शकते हा पुरस्कार ९ निकषांच्या आधारे मिळवलेल्या गुणांकानुसार जाहिर केला जाईल, तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था पुरस्कार योजनेविषयी संपुर्ण माहिती आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाद्वारे जाहिर केली जाईल.

१०. तंबाखू नियंत्रण उपक्रम - तंबाखूच्या दुष्परीणामा विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी पोस्टर्स, घोषणा, निबंध, प्रश्न मंजूषा, यासारख्या स्पर्धांचे आयोजन करावे. शैक्षणिक संस्थेने विद्यार्थी व शिक्षकांना तंबाखू नियत्रंण उपक्रम सुरू करण्यास प्रोत्साहीत करावे व अशा उपक्रमांचे कौतूक करावे. शैक्षणिक संस्थांनी कायदा अंमलबजावणी अधिसत्ता व आरोग्य संस्थाना आमंत्रीत करून तंबाखू नियंत्रणा विषयी माहिती दयावी यासंबंधी विविध सभा व चर्चा सत्राचे आयोजन करावे.

११. या मार्गदर्शक सुचनांच्या नियमित देखरेखीसाठी राज्य तंबाखू नियंत्रण कक्ष जबाबदार असेल व जी संस्था तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था म्हणून किमान बेंचमार्क यशस्वीपणे पुर्ण करेल त्या संस्थेस तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था प्रमाणपत्र देण्यासाठी राष्ट्रीय तंबाखू नियत्रंण कक्ष यंत्रणा पुरवेल.

१२. या सुचनांच्या अंमलबजावणी मध्ये नागरी संस्था, राज्य/जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष यांचा सहभाग महत्वाचा आहे, त्यांच्या सहकार्याने तांत्रिक यंत्राना व विविध नाविन्यपुर्ण उपक्रमांच्या माध्यमाने तंबाखू नियंत्रणाविषयी मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी अधिक सक्षमपणे होऊ शकते.

**<u>राज्य/जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष (कर्तव्य व जबाबदारी)</u>**

राज्य / जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष हे शिक्षण (शालेय शिक्षण/उच्च शिक्षण/व्यावसायिक शिक्षण) विभागाच्या मदतीने शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक कॅलेंडर मध्ये तंबाखू नियंत्रण उपक्रमांचा समावेश करण्यासाठी प्रयत्न करतील, व सदर सूचनांचे पालन त्या राज्य शिक्षण बोर्डाशी संलग्न असलेल्या शैक्षणिक संस्थांनी करावे.

जिल्हा व स्थानिक प्रशासकीय यंत्रणांना सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी व देखरेख संबंधी कार्यवाही करण्यासाठी सबळ यंत्रणा उभारण्यासाठी प्रोत्साहित करावे.

या मार्गदर्शक सूचनांचा प्रसार सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्यासाठी शिक्षण विभागाशी सहकार्य करावे व यासाठी लागणारा निधी हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत वितरित केल्या जाणाऱ्या निधीतून भागविण्यात यावा.

२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे, शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून तंबाखूमुक्त शाळा अभियान राबविण्याबाबत आवश्यक त्या सुचना संबंधित मुख्याध्यापकांना देण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२१०२१०१६२५३०६९२१ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA
SHANKARRAO PAWAR

Digitally signed by RAJENDRA SHANKARRAO PAWAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SCHOOL EDUCATION & SPORT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, serialNumber=01d5ac9d227fcf738d4d5a366976c83175db4f058411807fb1031c17dd155677, cn=RAJENDRA SHANKARRAO PAWAR
Date: 2021.02.10 16:31:53 +05'30'

**(राजेंद्र पवार)**

**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई

२) मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

३) मा.उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे सचिव

४) मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष,विधान सभा,विधानभवन,मुंबई

५) मा.सभापती व मा.उपसभापती,विधान परिषद, विधानभवन,मुंबई
६) मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
७) मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई
८) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९) मा.अपर मुख्य सचिव,गृह विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०) प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
११) प्रधान सचिव,महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१२)आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) सर्व सह सचिव/उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई
१५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६) शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे,
१८) राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई,
१९)सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,
२०)शिक्षण अधिकारी/ गट शिक्षण अधिकारी / शिक्षण निरीक्षक सर्व जिल्हा परिषदा / महानगरपालिका
२१) सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२) निवड नस्ती, एस.डी. ४ कार्यासन.

ANNEXURE

| **Self- Evaluation Scorecard for Tobacco Free Educational Institution** | | | |
|---|---|---|---|
| Name of the Educational Institution:-<br><br>Name and Designation of Evaluator :-<br><br>Date of Evaluation:-<br><br>Final Score of the Educational Institute:- | | | |
| Sr.No. | Criteria | Weightage Points | Scored points by the Institute |
| 1. | Display of 'Tobacco Free Area' Signage inside the premise of Educational Institute at all prominent place(s) | Mandatory(10) | |
| | The name/designation/contact number are mentioned /updated in the signage | Mandatory(10) | |
| 2. | Display of "Tobacco Free Education Institution" Signage at entrance/boundary wall of Educational Institute. | Mandatory(10) | |
| | The name /designation/contact number are mentioned/ updated in the signage | Mandatory(10) | |
| 3. | No evidence of use of tobacco products inside the premise i.e. cigarette /beedi butts or discarded gutka / tobacco pouches,spitting spots. | Mandatory(10) | |
| 4. | Poster or other awareness materials on harms of tobacco displayed in the premise. | 9 | |
| 5. | Organisation of at least one tobacco control activity during last 6 months. | 9 | |
| 6. | Disignation of Tobacco Moniters and their names,designations,and contact number are mentioned on the signages | 9 | |
| 7. | Inclusion of " No Tobacco Use" norm in the Educational Institute code of conduct guidelines | 9 | |
| 8. | Marking of 100 yards area from the outer limit of boundary wall / fence of the Educational Institute. | 7 | |
| 9. | No Shops selling tobacco products within 100 yards of the Educational Institute. | 7 | |